सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२५/ पोल-८, दि. २२/०४/२०२६.

**विषय :-** राज्यात वाहतुक नियंमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी ई-चलान वसुलीकरिता तंत्रज्ञान वापर व दंडात्मक कारवाई संदर्भात शिफारशी करण्यासाठी अभ्यास गट स्थापन करणेबाबत

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२६/ प्र.क्र.२५/पोल-८, दि. २२/०४/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४२२१६४३१७७९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 23-04-2026 14:41:17

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक, (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ई-चलन वसुलीकरिता तंत्रज्ञान वापर व दंडात्मक कारवाई संदर्भात शिफारशी करण्यासाठी अभ्यास गट स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र. २५/पोल-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २२ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना :-**

सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात राज्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ई-चलन तयार करताना खाजगी मोबाईल फोन वापरणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यासंदर्भात विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक ४७८७ चर्चेदरम्यान मा. मुख्यमंत्री महोदय यांनी "ई-चलन वसुलीसंदर्भात याबाबत निश्चितपणे तंत्रज्ञानाचा वापर करुन त्या व्यक्तीचा मागोवा घेतला जाईल व त्या व्यक्तीला कठोरपणे शिक्षा दिली जाईल यासंदर्भात वेगवेगळ्या देशांतील किंवा राज्यांतील याबाबत वापरल्या जाणाऱ्या पध्दतीचा अभ्यास करण्यात येईल. तसेच महसूल वाढीचे लक्ष पूर्ण करण्यासाठी ई-चलनाचा पोलीसांमार्फत गैरवापार होणार नाही याचा देखील अभ्यास करण्यात येईल, याकरिता वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांचा अभ्यास गट स्थापन करण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे. त्यानुषंगाने वरिष्ठ स्तरीय अभ्यास गट स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ई-चलन वसुलीकरिता तंत्रज्ञान वापर व दंडात्मक कारवाई संदर्भात शासनास शिफारशी करण्यासाठी खालील प्रमाणे अभ्यास गट स्थापन करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासगटाचे सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ४ | अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ५ | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, | सदस्य |
| ६ | पोलीस सह आयुक्त (वाहतूक), वरळी, मुंबई, | सदस्य |
| ७ | सह सचिव/उप सचिव (पोल-८), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य सचिव |

२. सदर अभ्यास गटाची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील.

१) ई-चलन वसुलीकरिता तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना व दंडात्मक शिक्षा करणेबाबत इतर देशातील व राज्यातील वापरल्या जाणाऱ्या पध्दतींचा अभ्यास करुन शासनास शिफारस करणे व धोरणात्मक बाबी सुचविणे.

२) महसूल वाढीचे लक्ष पूर्ण करण्याच्या अनुषंगाने पोलीसांमार्फत ई-चलनाचा गैरवापर होणार नाही याबाबत उपाययोजना सुचविणे.

३. सदर अभ्यास गटाने उपरोक्त बाबीच्या शिफारशींसह शासनास तीन महिन्यांत अहवाल सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२२१६४३१७७९२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRITAMKUMAR VASANTRAO JAWALE
Date: 2026.04.22 16:44:23 +05'30'

**( प्रितमकुमार जावळे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
२. मा. राज्यमंत्री गृह ( शहरे ) यांचे खाजगी सचिव,
३. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. पोलीस सह आयुक्त (वाहतूक), वरळी, मुंबई,
९. सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. निवड नस्ती पोल-८,